महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २८ वा दिनांक : १५/१०/२०२४ वार : मंगळवार

## सत्ता चुकीच्या हातात गेली. महाराष्ट्र पुन्हा उभा करायचा आहे - शरद पवार



**फलटण** : फलटणमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षातील आमदार दीपक चव्हाण यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे अजित पवारांनी दीपक चव्हाण यानं फलटण मतदारसंघातून उमेदवारी देखील जाहिर केली होती. असे असताना देखील दीपक चव्हाण यांनी शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश करत अजित पवारांना मोठा धक्का दिला आहे.

यावर शरद पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार म्हणाले, आपल्याला महाराष्ट्र पुन्हा उभा करायचा आहे. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत ४८ पैकी ३१ जागा जिंकल्यानंतर यांना लाडकी बहीण आठवली, असे म्हणत शरद पवारांनी महायुती सरकारवर हल्लाबोल चढवला. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, स्वत:च्या बहिणीबद्दल आस्था असतेच. मागे कधी बहीण आठवली नाही. पाच वर्ष देवेंद्र फडणवीस यांच्या हातात सत्ता होती तेव्हा बहीण दिसली नाही. लोकसभेला जेव्हा पराभव झाला तेव्हा बहिण आठवली. बारामतीकर लय हुशार आहेत. तिथे एक बहीण उभी होती. प्रचाराला गेलो की लोक गप्प बसायचे. इतक्या वर्षाचे संबंध होते, जीवाभावाचे होते. पण बारामतीकरांना मताच्या स्वरूपात बहिणीला पाठिंबा दिला.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, मला ६० वर्षात एकदाही सुट्टी दिली नाही. मला ४ वेळा मुख्यमंत्री केले. महाराष्ट्राचा चेहरा बादलायचा माझी नैतिक जबाबदारी आहे. चुकीच्या हातात सत्ता आहे. महाराष्ट्रात अत्याचार होत आहेत. शाळेत मुलींवर अत्याचार होत आहेत. काल एका माजी मंत्र्याची हात्या झाली. सामान्य माणूस आणि आया बहिणी सुरक्षित नाहीत, असे शरद पवार म्हणाले. पुढे ते म्हणाले, तुम्ही काळजी करू नका, आपल्याला लांब जायचे आहे. या तुतारीने संबंध देशात आवाज आल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास शरद पवारांनी व्यक्त केला.

खासदार अमोल कोल्हे काय म्हणाले? फलटणमध्ये गेल्यानंतर तुतारी वाजणार नाही हे जमत नव्हतं. पण तुम्ही ते जमवलं त्याबद्दल तुमचे आभार आणि अभिनंदन. फलटणमध्ये नव्हे तर संपूर्ण गावागावात गेल्यानंतर सांगितले जाते तुतारी हाती घ्या. रामकृष्ण हरी, वाजवा तुतारी हा महाराष्ट्राचा मंत्र आहे. हरियाणासारखे महाराष्ट्रात घडू शकत नाही. कारण टायगर अभी यहाँ खडा हैं. मागील वर्षी २ जुलैला घेतलेला निर्णय हा मारून मुटकुन घेतलेला होता. मात्र आता मनापासून निर्णय घेतला आहे. दिल्लीपतीसमोर गुडघे टेकणे बास, आता निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र हा झुकणार नाही आणि स्वाभिमान विकणार नाही

आमदार दीपक चव्हाण काय म्हणाले? आमदार दीपक चव्हाण म्हणाले की, १९९९ साली राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाली तेव्हापासून मी पक्षात काम करत आहे. २००९ साली मला विधानसभेची संधी मिळाली. २००९ पासून आजपर्यंत ३ टर्म फलटण तालुक्याचे मी प्रतिनिधित्व करतोय. सुरुवातीपासून शरद पवारांसोबत काम करतोय. ज्यावेळी राष्ट्रवादीत फूट पडली तेव्हा आमच्या सर्वांसमोर धर्मसंकट उभे राहिले. शरद पवारांबाबत जेवढा आदर तेवढाच अजितदादांचा आहे. घरातच फूट पडल्यामुळे नेमका निर्णय काय घ्यायचा हा प्रश्न निर्माण झाला. महाविकास आघाडीत आम्ही अडीच वर्ष सत्तेत होतो. जेव्हा सरकार पडले तेव्हा आमची जी कामे होती, त्याला तात्काळ स्थगिती दिली. वर्षभर कामे खोळंबली, लोकांच्या मागण्या, तालुक्याचा विकास पुढे करण्यासाठी रामराजे नाईक निंबाळकरांच्या नेतृत्वात आम्ही महायुतीत सहभागी झालो.

## राज्यात विधानसभेची आचारसंहिता उद्या लागण्याची दाट शक्यता




**मुंबई** : लोकसभा निवडणुकीत झालेल्या जोरदार राजकीय संघर्षानंतर संपूर्ण राज्याला आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. राज्यात विधानसभा निवडणुका कधी जाहीर होणार आणि आचारसंहिता कधीपासून लागेल याबाबत सध्या चर्चा सुरु आहेत. कारण आधीच लांबलेली विधानसभा निवडणूक कधी लागतेय याकडं सर्वांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.

पण आचारसंहिता कधीपासून लागू होईल यासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार येत्या दोन दिवसाच्या आत विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची दाट शक्यता आहे.

विधानसभेची आचारसंहिता कोणत्याही क्षणाला लागू शकते. उद्या निवडणूक आयोग पत्रकार परिषद घेऊन राज्याच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा करण्याची शक्यता आहे. मंत्रालयात हालचाली गतीमान झाल्या असून सुट्टीच्या दिवशीही मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत. रविवारी सुट्टी असतानाही सामाजिक न्याय विभागाचे सात शासन निर्णय जारी करण्यात आले आहे.

आज पुन्हा सकाळीच साडेनऊ वाजता बोलावली मंत्रिमंडळाची बैठक बोलवली आहे. महायुती सरकारची ही शेवटची मंत्रिमंडळाची बैठक ठरण्याची शक्यता आहे. त्यासाठी आज मोठ्या प्रमाणावर निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले जाणार आहे. कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू शकतेआगामी विधानसभा निवडणूक ही अटीतटीची असणार आहे. महायुतीविरुद्ध महाविकास आघाडीने ही चांगलीच कंबर कसलीय. त्यामुळे थेट लोकांशी संबंधित असलेल्या योजना सुरु करण्याचा धडाका महायुती सरकारने लावलाय.

मात्र कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू शकते. म्हणून मागील आठवड्यात दोन दोन मंत्रीमंडळ बैठका होताना पाहायला मिळत आहे. मंत्रिमंडळ बैठकीत अधिक निर्णय घेतले जात आहेत.

आमदारांपासून मंत्र्याची धावाधावलोकप्रिय योजनांचे निर्णय तर होताना पाहायला मिळत आहे. मात्र महायुतीमधील नेत्यांच्या लाभाचे निर्णय ही सुद्धा मोठ्या प्रमाणावर होताना पाहायला मिळत आहेत. अनेक निर्णय हे नियमना डावलून घेतले जात असल्याची टीका विरोधकांकडून मोठ्या प्रमाणावर होताना पाहायला मिळत आहे.

मंत्रीमंडळ बैठकीत तर शासन निर्णय काढण्याचा धडाका सुरू आहे. दिवसाला शेकडो शासन निर्णय जारी होताना पाहायला मिळत आहे. त्यासाठी आमदारांपासून मंत्र्याची चांगलीच धावाधाव सुरु झालीय. आचारसंहितेच्या आधीच टेंडर काढण्यासाठी सर्वांनी तागद पणाला लावलीय. विशेष म्हणजे लोकप्रतिनिधींना निधी मिळणारे शासन निर्णय सर्वाधिक पाहायला मिळत आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४


## शिवाजी महाविद्यालय अकोला संघाने फुटबॉलमध्ये मिळवली चॅम्पियनशिप




**अकोला :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठआंतर महाविद्यालय फुटबॉल स्पर्धा (मुले) मध्ये शिवाजी महाविद्यालय संघाने फुटबॉलमध्ये चॅम्पियनशिप जिंकली.

संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगाव येथे झालेल्या झोन बीच्या स्पर्धेमध्ये अंतिम सामन्यात संत मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हाच्या संघाला ट्राय बेक्ररमध्ये हरवले त्यानंतर डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावतीला झालेल्या झोन फायनलमध्ये जी.एस. टोम्पे महाविद्यालय ,चांदुर बाजार च्या बलाढ्य संघाला श्री शिवाजी महाविद्यालय अकोला संघाने मध्यंतरानंतर पेनाल्टी किक द्वारा १-० अशी बढत घेतली. विजय गोल तसबुर खान या खेळाडूंनी करून पहिल्यांदाच या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवले व चॅम्पियनशिप जिंकली.

अकोला च्या संघातील खेळाडू मोहीम खान (कप्तान), अश्फाक बेहेरेवाले(गोलकीपर) साद अहमद, माजिद खान, शेख जरीर, मो. आवेस, मो. बिलाल तसवीर खान , वजाहत अहमद, खिजर, राज, मोहम्मद दानिश, मोहम्मद अर्ष, अरबाज हुसेन, मो. साद, मो. शहरोज, शेख शहबाद, शेख जाहिद, अबित शहा, समीर या खेळाडूंनी आपसी तालमेल, परफेक्ट पासेस स्ट्राँग डिफेन्स आधारे खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. महाविद्यालयात फुटबॉल संघाचे स्वागत केले याप्रसंगी दिलीप इंगोले यांनी खेळाडूंचा सन्मान केला.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला सतीशचंद्र भट्ट जावेद अली(फुटबॉल खेळाडू), सुरज कुमार दुबे(राज्य क्रीडा मार्गदर्शक), प्राचार्य डॉ. किरण खंडारे आणि डॉ.आनंदा काळे उपस्थित होते.

खेळाडूंना सुविधा : फुटबॉलच्या सर्व खेळाडूंना बक्षीस म्हणून ट्रॅक सूट आणि शूज देण्याची घोषणा प्राचार्यांनी केली. खेळाडूंना विशेष सुविधा पुरवण्याचे आश्वासनही याप्रसंगी त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय काळे केले. आभार प्रदर्शन क्रीडा शिक्षक नितीन वाघमारे यांनी मानले.

## जयभवानीचा संदिप लटके राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत राज्यातुन दुसरा



**पाटोदा :** दि.१४ऑक्टोबर : येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थीनी महाराष्ट्र राज्यस्तरीय कुस्तीगीर संघ व महाराष्ट्र शासन आयोजित " स्वर्गीय खशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे.या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत ७९किलो वजन गटातुन महाविद्यालयाचा विद्यार्थी संदिप लटके यानी महाराष्ट्र राज्यातून सर्व प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.तर याच महाविद्यालयाचा विद्यार्थी पृथ्वीराज वनवे याने ९२ किलो वजन गटात राज्यातून सर्व तृतीय येण्याचा मान मिळवला आहे.या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.विश्वास कदम व क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.प्रवीण शिलेदार यांचे मार्गदर्शन मिळाले.त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.त्यांनी या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत मिळविलेल्या यशाबद्दल संदिप लटके,व पृथ्वीराज धनवे यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित,अध्यक्ष माजी आ.मा.श्री.अमरसिंह पंडित,सचिव मा.श्री.जयसिंह पंडित,मा.श्री.विजयसिंह पंडित व युवा नेते मा.श्री.रणवीर काका पंडित,मा.श्री.पृथ्वीराजे पंडित,विकास समितीचे सदस्य मा.श्री.दिलीपराव जाधव, भैय्यासाहेबचे स्लिम साह्यक श्री.अमृत गावकर, प्रशासकीय अधिकारी मा.श्री.प्रमोद गोरकर, श्री.प्रताप हातोटे,श्री. काशीनाथ गोगुले,प्राचार्य डॉ.विश्वास कदम ,प्रा.सोमनाथ घाडगे,प्रा.बाळासाहेब जोशी,व सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन करून शुभेच्छा!दिल्या आहेत.

## माझा लढा अठरापगड जातींचे प्रश्न सोडवण्यासाठी- मनोज जरांगे पाटील

**गंगापूर :** माझा लढा हा गरजवंत मराठ्यांसह अठरापगड जातींचे प्रश्न सोडवण्यासाठी असून, गरिबांचे प्रश्न गरीबच सोडवू शकतात. त्यामुळे तुम्ही सर्वजण एकजुटीने या लढ्याच्या पाठीमागे उभे राहा, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

गंगापूर सहकारी साखर कारखाना परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सुशोभीकरण व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण रविवारी झाले. अध्यक्षस्थानी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पणतू राजरत्न आंबेडकर, गणेश माने-देशमुख व संयोजक कृष्णा पाटील डोणगावकर यांची उपस्थिती होती.

जरांगे म्हणाले, "हा संपूर्ण कार्यक्रम सामाजिक असल्यामुळे मी येथे आलो आहे. कुठल्याही सामाजिक प्रश्नांवर मला हाक द्या, मी त्याला प्रतिसाद देईल". या कारखान्याच्या माध्यमातून तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल, असा आशावाद व्यक्त करीत तुमचे योगदान कधीही वाया जाऊ देणार नाही, असेही त्यांनी सांगितले. आयोजक व कारखान्याचे चेअरमन कृष्णा पाटील डोणगावकर यांनी प्रास्ताविक केले.

अंबादास दानवे यांनी संविधान धोक्यात आणण्याचे काम काही लोक करीत असल्याचे सांगून त्यासाठी शिवशक्ती- भीमशक्तीची एकजूट गरजेची असल्याचे सांगितले. राजकारणी व संधीसाधू लोकांनी महापुरुषांना जातीच्या पेटाऱ्यांमध्ये बंदिस्त केले असून, जातीचे बंदिस्त पेटारे फोडण्याचे काम मनोज जरांगे पाटील यांच्या माध्यमातून पुढील काळात होणार असल्याचा आशावाद राजरत्न आंबेडकर यांनी व्यक्त केला. यावेळी गणेश माने-देशमुख यांचेही भाषण झाले.

## निवडणुकीपूर्वी सरकारची दिवाळी भेट

**मुंबई :** एसटी महामंडळाकडून दिवाळीनिमित्त दरवर्षी १० टक्के हंगामी भाडेवाढ केली जाते. मात्र दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता यंदा करण्यात आलेली हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. या निर्णयामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील एसटी बसने प्रवास करणाऱ्यांच्या खिशाला कात्री बसण्यापासून सुटका होणार आहे. विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील जनतेची नाराजी निर्माण होऊ नये, म्हणून भाडेवाढ रद्द करण्यात आली, असे बोलले जात आहे.

एसटी महामंडळाने दिवाळीनिमित्त यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर अशी एका महिन्यासाठी हंगामी भाडे वाढ लागू करण्याचा निर्णय घेतला होता. यासंदर्भात परिपत्रक जारी करण्यात आले होते. ही प्रस्तावित भाडेवाढ मुंबई ते पुणे मार्गावर शिवनेरी बस वगळता सर्व बसेससाठी लागू होती. या भाडेवाढीमुळे एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार होती. मात्र एसटी महामंडळाने प्रवाशांना दिलासा देत हंगामी भाडेवाढचा निर्णय रद्द केला आहे.

## निवडणुकीच्या तोंडावर छगन भुजबळ अडचणीत?



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे मंत्री छगन भुजबळ पुन्हा अडचणीमध्ये येण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यासह इतर दोघांनी कथित महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी भुजबळांना मिळलेल्या दोषमुक्तीविरोधात कोर्टात एक याचिका दाखल केली होती. या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

कथित महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी भुजबळ कुटुंबीयांना दोषमुक्ती मिळाली होती. एसीबीच्या विशेष न्यायालयाने ९ सप्टेंबर २०२१ रोजी हा निर्णय दिला होता. याच निर्णयाला सामाजिक कार्यकर्त्यांनी आव्हान दिले आहे. अंजली दमानिया, दीपक देशपांडे यांच्यासह आमदार सुहास कांदे यांनी तीन स्वतंत्र याजिका दाखल केल्या आहेत. या याचिकांवर एप्रिलमध्ये न्यायालयाने भुजबळ कुटुंबीयांना नोटीसा देखील बजावल्या होत्या. पण सुनावणी थंडावली होती. या आव्हान याचिकांवर तात्काळ सुनावणी घेण्यात यावी, यासाठी याचिकाकर्ते आग्रही आहेत. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकांमध्ये छगन भुजबळ यांच्या अडचणी वाढू शकतात.

काय आहे हा घोटाळा ? छगन भुजबळ हे सार्वजनिक बांधकाम मंत्री होते, त्यावेळी जारी करण्यात आलेल्या विविध कंत्राटातून भुजबळ कुटुंबीयांच्या कंपन्यांना मोठ्या प्रमाणात रोख रक्कम लाचेच्या स्वरुपाचा मिळाला, असा आरोप होता. महाराष्ट्र सदन आणि इंडिया बुल्स प्रकरणामध्ये राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून ११ जून २०१५ रोजी स्वतंत्र गुन्हे दाखल केले होते. यानंतर १५ जून २०१५ रोजी सक्तवसुली संचालनालयाने देखील भुजबळ यांच्याविरोधात काळा पैसा प्रतिबंधक कायदान्वये दोन गुन्हे दाखल केले होते. यामध्ये समीर भुजबळ, पंकज भुजबळ, तन्वीर शेख, इम्रान शेख यांचा समावेश होता.

भुजबळ २ वर्षे होते तुरुंगात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला कारवाई करण्यासाठी परवानगी दिली. त्यानंतर भुजबळ यांच्यावरील कारवाईला सुरुवात झाली होती. या प्रकरणात मार्च २०१६ मध्ये छगन भुजबळ यांची १० तासांपेक्षा अधिक चौकशी झाली होती. यावेळी त्यांना अटक झाली होती. त्यानंतर भुजबळ सुमारे २ वर्ष तुरुंगात होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४

## बीट खाण्याचे फायदे



हेल्दी असण्यासोबतच बीट त्याच्या सुंदर लाल रंगामुळेही लोकप्रिय आहे. बीट किंवा बीटरूटच्या विशेष चवीमुळे सॅलड्साठी त्याला सगळ्यांची पसंती असते. बीट चवदार असण्यासोबतच आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. बीटचे सेवन केल्याने शरीरातील हिमोग्लोबिन योग्य राहते आणि त्वचा चमकदार आणि सुंदर राहते. बीटमध्ये कॅलरीज कमी असतात आणि जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारख्या पोषक तत्व भरपूर असतात. बीट हे प्रथिने, निरोगी चरबी, फोलेट, मॅग्नेशियम, लोह, तांबे, फायबर आणि व्हिटॅमिन सी यांचा उत्कृष्ट स्रोत आहे. नियमित आहारात बीटचा समावेश केल्याने मेंदूचे कार्य सुधारते आणि चयापचय वाढते. आज आपण बीटचे सर्व फायदे जाणून घेऊया. बीटचे आरोग्य फायदे उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठी उपयुक्त.

आजकाल बहुतेक लोकांसाठी उच्च रक्तदाब ही गंभीर समस्या बनली आहे, ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोकाही वाढतो. त्यावर पोषक तत्वांनी समृद्ध बीट उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी खूप फायदेशीर ठरते. बीट हा फोलेटचा उत्कृष्ट स्त्रोत आहे, जो रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी प्रभावी आहे. पचनासाठी फायदेशीर - बीटरूटमध्ये भरपूर फायबर आढळते, ज्याचे सेवन केल्याने पचनक्रिया बरोबर राहते आणि बद्धकोष्ठतासारख्या अनेक गंभीर समस्या कमी होतात. चांगल्या पचनासह, बीटचे नियमित सेवन केल्याने मधुमेह आणि हृदयाशी संबंधित जुनाट आजारांचा धोका देखील कमी होतो. कामात स्टॅमिना वाढतो - तज्ज्ञांच्या मते, बीटरूटचे सेवन स्टॅमिना वाढवण्यास मदत करते. नियमित बीटरूट खाल्ल्याने शरीरात ऑक्सिजन वाढतो, ज्यामुळे एखाद्या व्यक्तीची ऍथलेटिक कामगिरी सुधारते. सर्वोत्कृष्ट परिणामांसाठी तुम्ही कोणतीही शारीरिक क्रिया करण्यापूर्वी सुमारे २ तास आधी बीटचा रस घेऊ शकता.

मेंदूच्या आरोग्यासाठीही फायदेशीर - मेंदू हा शरीरातील सर्वात महत्त्वाचा अवयव मानला जातो, त्यामुळे मेंदूच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. बीटरूट नायट्रेट्सने समृद्ध आहे, त्यामुळे मेंदूच्या कार्यामध्ये सुधारणा करण्यासोबत रक्त प्रवाह वाढवतो. बीटचे नियमित सेवन केल्याने मेंदूची स्मरणशक्तीही सुधारते. हे वाचा - हिवाळ्यातही हवीये कोरडी, मुलायम त्वचा? तर 'हे' आहेत घरगुती स्वस्तात मस्त उपाय **(टीप : येथे दिलेली माहिती सामान्य ज्ञानावर आधारित आहे. एमजे न्यूज त्याची हमी देत नाही. अधिक माहितीसाठी संबंधित तज्ज्ञांचा सल्ला)**

## फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष पदी डॉ. ऋषिकेश कांबळे



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद दोन हजार नऊ पासून छत्रपती संभाजीनगरमध्ये फुले शाहू आंबेडकरी साहित्य विचाराचा प्रचार- प्रसार करत आहे.परिषदेने २०१६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या एकशे पंचवीसव्या जयंतीनिमित्त मराठवाडाभर खेड्या-पाड्यात जाऊन सव्वाशे व्याख्यांनाची व्याख्यानमालाच राबविली होती.त्यानंतर परिषदेने महाराष्ट्रात पहिल्यांदा "सुभेदार रामजीबाबा व्याख्यानमाला" सुरु केली. या व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते दै.सकाळचे संपादक- उत्तम कांबळे, हनुमंत काका उपरे,न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील, मा.ऍड.एकनाथ अव्हाड, न्या.बी.एम. देशमुख अश्या थोर विचारवंतांना बोलविण्यात आले होते.

या सोबतच या परिषदेने दोन साहित्य संमेलन भरविली त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.पहिले साहित्य संमेलन प्रख्यात विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली झाले तर दुसरे साहित्य संमेलन दलित साहित्यिक उपराकार ,लक्ष्मण माने यांच्या अध्यक्षतेखाली झाले.त्याचाच परिपाक म्हणून देशाच्या बाहेर या साहित्य संमेलनाची दखल घेतल्या गेली , थायलंड येथील "पटाया इंडियन असोसिएशन" ५या भारतीय वंशाच्या संस्थेने बँकॉक येथे " फुले शाहू आंबेडकरी विश्व साहित्य संमेलन" घेण्यासाठी परिषदेला पाचरण केले आहे.

परिषदेने त्यांचे निमंत्रण स्वीकारले असून परिषदेच्या वतीने ५ जानेवारी २०२५ रोजी बँकॉक शहरात हे साहित्य संमेलन घेण्यात येणार आहे.या साहित्य विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रख्यात आंबेडकरी विचारवंत प्रोफेसर डॉ.ऋषीकेश कांबळे सरांची निवड सर्वानुमते करण्यात आली आहे.

डॉ. ऋषिकेश कांबळे यांचा जन्म हा मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. लहान पनापासूनच प्रचंड वाचनाची आवड असल्यामुळे त्यांची लेखन शैली ही कायम सरस राहिली. लेखनाबरोबरच त्यांची बोलण्याची शैली उत्तम असल्यामुळे वक्ता म्हणून संबंध महाराष्ट्रभर नाही तर देशभर ते परिचित आहेत.समीक्षा, कविता, नाट्य लेखनामध्ये सरांची हातोटी असल्यामुळे देशभरातून सरांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सरांचे लेखन :

१) अस्तित्व आणि अस्मिता (वैचारिक लेखसंग्रह)
२) कालवाह (समीक्षा )
३) दलित कविता : संदर्भ आणि संदर्भ खंड - १ (समीक्षा )
४) खोलपाणी (फ. मुं. शिंदे यांच्या समग्र कवीतेची समीक्षा )
५) वेदना आणि अविस्कार (कवित्रींच्या कवितेची समीक्षा )
६)शिक्षणप्रेमी बाबासाहेब आंबेडकर - (नवसाक्षरांसाठी, शासकीय प्रौढ शिक्षण संस्थेकडून प्रकाशित )
७) परिवर्तन आणि प्रबोधन (वैचारिक लेखसंग्रह)
८) भाई तुम्ही कुठे आहात ! (दोन अंकी नाटक)
९) नवे युग : नवे वारे (समीक्षा )
१०) लोककवी वामनदादा कर्डक गौरव अंक (संपादन)
११) साहित्य समाज आणि संस्कृती (डॉ. गंगाधर पानतावणे गौरव ग्रंथ ( संपादन)
१२) सृजन (संपादन)
१३) जागितकीकरण आणि भारतीय समाज (संपादन)
१४) साहित्य प्रवर्ती : तत्वशोध (डॉ. दादा गोरे गौरवग्रंथ - संपादन)
१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक अग्रलेख (संपादन)

असे अनेक सरांचे नावाजलेले ग्रंथ वैचारिक छाप पाडून गेले.

पुरस्कार व सन्मान :

१) लोकमत उत्कृष्ठ लेखन पुरस्कार, दैनिक लोकमत, नागपूर, १९९५ - ९६.
२) वामनदादा कर्डक सामाजिक कृतज्ञता १९९८.
३) डॉ. नागनाथ कोतापल्ले ग्रामीण साहित्य पुरस्कार १९९८-९९.
४) पेरियार रामस्वामी नायकर समाज संघटक पुरस्कार , २०००.
५) लोकपीठ साहित्य पुरस्कार २००१६)स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा गौरव पुरस्कार, २००२.
७) फु ले-शाहू-आंबेडकर परिवर्तन पुरस्कार , २००२.
८) अंधश्रद्धा निर्मूलन शिक्षक गौरव पुरस्कार, २००२,
९) महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कार, नेहरु युवा केंद्र नवी दिल्ली २०११.
१०) प्रियदर्शनी क्रांतिरत्न अवॉर्ड २०११.
११) अस्मितादर्श वाडमय पुरस्कार २०११ आणि २०१६
१२) उत्कृष्ट मराठी वांडमय (श्री. के. क्षीरसागर ) राज्य पुरस्कार कार, महाराष्ट्र शासन २०१३
१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन एप्रिल २०१८

अशा विविध पुरस्काराने सरांना सन्मानित केले आहे.

अनेक साहित्य संमेलनाचे सर अध्यक्ष झालेत जसे अस्मिता दर्श साहित्य संमेलन, युवा साहित्य संमेलन,समतावादी साहित्य संमेलन, फुले शाहू आंबेडकर साहित्य संमेलन, आंबेडकरवादी साहित्य संमेलन विविध कार्यक्रमस्थळी सरांना उदघाटनक बोलविण्यात आले.

डॉ. ऋषिकेश कांबळे सरांचे साहित्यात असे अफाट कार्य कर्तृत्व असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेने थायलंड येथे होऊ घातलेले पहिल्या विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करण्याचे ठरविले आहे. सरांनी परिषदेला होकार दिल्यामुळे हे होऊ घातलेले संमेलन महाराष्ट्र राज्यात नाही तर देशाच्या बाहेर "फुले शाहू आंबेडकरी साहित्य विचाराची पताका नक्कीच जगभर फडकवेल यात शंका नाही.

## बुद्धाचा मार्ग हा विज्ञानवादी - शहादेव गाडगे




**छ. संभाजीनगर (बाळासाहेब लिहिणार)**: राजधानी नगर (पडेगाव ) येथे आज दिनांक १२ऑक्टोबर २०२४रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राजधानी नगर व परिसरातील नागरिक एकत्र येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेला बौद्ध धर्म हा जागतिक धर्म कसा यावर चिंतन मनन करण्यासाठी मुख्याध्यापक मा. शहादेव गाडगे यांचे विशेष व्याख्यान ठेवले होते. शहादेव गाडगे यांनी आपली भूमिका मांडताना बुद्धाचा धर्म हा कर्मकांडावर नाहीतर विज्ञानावर आधारीत होता असे मत केले.संबंध भारतीयांची प्रगती हवी असेल तर कर्मकांड लाथाडून विज्ञानवादी बना असा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी प्रा.श्रीमती सत्वशिला मखरेताई यांनी महिलांनी पुरुषाच्या बरोबरीचे काम सुरु केले आहे त्यात आता फक्त घर नाही तर दारात लक्ष देऊन महिलांनी पुढे यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.माणिक वाघमारे सर यांनी केले. प्रस्ताविकात डॉ.वाघमारे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांचा बौद्ध धम्म हा परंपरा नाकारून क्रांती घडवून आणणारा धम्म आहे सुचविले या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. कालिदास भांगे यांनी सम्राट अशोकानी बुद्ध धर्म हा जगभर कसा पोहचवीला आणि त्याचा ऱ्हास झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माला कसे पुनरजीवीत केले याची माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब लिहिणार केले तर आभार मा. मधुकर गंगावणे यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहेर साहेब, सौ उज्वला लिहिणार सौ. उषा वाघमारे, सौ.भावना गंगावणे, विवेक लिहिणार, प्रदीप साळवे व सौ साळवे मॅडम प्रीती घाडगे,अवनी लिहिणार आदिनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४


## ती



**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

तिची माझी पहिलीच भेट
ती माझ्याकडे बघून हास्य करत असे
कॉलेजमध्ये ती माझ्याकडे सारखी
चंचल नजरेने पाहत असे
तेव्हा पासून तिची स्मुर्ती माझ्या मनाला अस्वस्थ करत होती
माझ्या सोबत ती बोलण्याची प्रयत्न करत होती.
मात्र तशी संधी येत नव्हती.
एक दिवस कॉलेजमधून ती जात होती
चालता चालता थबकत होती
मी ओळखले ती माझ्या सोबत बोलणार होती.
लगेच ती थांबली आणि म्हणाली
उद्या राखी पौर्णिमा आहे तुला राखी बांधायची आहे
शेवटी स्पष्ट झाले
ती माझी बहिण आहे
ती माझी बहिण आहे.

## मानसिक आजारांमागे करणी, जादूटोणा नसतो : डॉ. श्रीकांत मेश्राम यांचे प्रतिपादन



**यवतमाळ :** मानसिक आजारामागे करणी, जादूटोणा आहे. त्यामुळे यातील बाधितांना केवळ मांत्रिक किंवा महाराज बरे करु शकतात. या फाजिल समजुतीमुळे बाधित व्यक्तीवर डॉक्टरांचे उपचार सर्वात शेवटी होतात. मानसिक आजारांना सर्वप्रथम मान्य केले, तर बाधितांवर वेळेवर उपचार होऊ शकतील, असे प्रतिपादन मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत मेश्राम यांनी केले.

गुरुवारी नंददीप फाऊंडेशन येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त २० मनोरुग्णांचा रवानगी सोहळा आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते.

उद्योजक, समाजसेवक भारतरत्न रतन टाटा यांना अभिवादन आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सावित्री समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. घनश्याम दरणे, ज्येष्ठ समाजसेवक सुरेश राठी, बळवंत चिंतावर, अनंत कौलगीकर, प्रशांत बनगीनवार, पत्रकार आनंद कसंबे तसेच नितीन पखाले उपस्थित होते. पुढे डॉ. मेश्राम म्हणाले की, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने २०३० पर्यंत मधुमेह, डिप्रेशनचे रुग्ण तसेच आत्महत्येचे प्रमाण झपाट्याने वाढेल, असा सूचक इशारा दिला आहे.

परंतु, दुर्दैवाने आपल्या कडे अन्य आजारांप्रमाणे मानसिक आजारांकडे पाहण्या ची वैज्ञानिक दृष्टी नाही. अध्यक्षीय भाषणातून प्रा. दरणे यांनी नंददीप फाउंडेशनचे संदीप व नंदिनी शिंदे यांच्यासोबतच मनोरुग्ण सेवेत झटणाऱ्या असंख्य व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आपला हा आजार इतरांना कळू नये, यासाठीचा त्यांचा हा प्रयत्न मानसिक आजारांना अधिकच बळावत नेतो. परंतु, जोपर्यंत आपण वास्तव स्वीकारणार नाही तोपर्यंत पुढे जाऊ शकणार नाही, यावर त्यांनी भर दिला. प्रास्ताविक नंददीपचे नरेंद्र पवार यांनी, तर संचालन निशांत सायरे यांनी केले.

पुनर्वसनासाठी सज्ज अशा वीस प्रभूजींच्या औक्षणाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

२० मनोरुग्णांचे पुनर्वसन नवीन चौधरी, मंगेश चौधरी, दीनदयाळ रामभरोसे कहार, सुकुरमनी कलहंडी, जनार्धन, गंजू, मीना कुमारी, बसंती, महागाव आजी, किरण अण्णा, आझाद अण्णा, मंगला बोरकर, गोविंद शेंडे, नारायण कनकमवार, कमलाकर शिंदे, शंकर पिंपरे, लीला राठोड, सूरज मिठेकर, धीरज लकडा तसेच कदम काका यांच्यावर यशस्वी उपचार झाल्याने त्यांचे स्वगृही पुनर्वसन करण्यात आले आहे.

नेपाळ, उत्तरप्रदेश, झारखंड, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश व महाराष्ट्रातील हे मनोरुग्ण याठिकाणी उपचार घेत होते.

## वकील गुणरत्न सदावर्ते बिग बॉसच्या घरातून येणार बाहेर? मुंबई उच्च न्यायालयाने फटकारले




**मुंबई :** वकील गुणरत्न सदावर्ते हे सध्या बिग बॉस हिंदीच्या घरात गेले आहेत. मात्र त्यांना आता लवकरच घरातून बाहेर पडावे लागणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्यावर ताशेरे ओढले असल्यामुळे गुणरत्न सदावर्ते लवकरच बाहेर पडणार असल्याचे बोलले जात आहे. मुंबई उच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकेवर सुनावणी पार पडली, यावेळी गुणरत्न सदावर्ते यांच्या वर्तणूकीवर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे.

मराठा आरक्षणाची एवढी महत्त्वाची सुनावणी सुरू असताना सदावर्ते बिग बॉसमध्ये जाऊन बसलए आहेत, अशी माहिती वकिलांकडून उच्च न्यायालयात देण्यात आली. यावर या प्रकरणातील मूळ याचिकाकर्त्यांना प्रकरणाचे गांभीर्य नाही का? आपली याचिका सर्वात आधी घ्या म्हणून सदावर्ते आमच्यापुढे विनंती करत होत. आता युक्तिवाद करण्याची वेळ आली तर तेच गायब झाले?, असा सवाल हायकोर्टाने केला आहे. तसेच मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या सर्व याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद संपला. आता कुणालाही युक्तिवाद करण्याची संधी मिळणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदावर्ते यांना युक्तिवाद करता येणार नाही.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने फटकारल्याने गुणरत्न सदावर्ते बिग बॉस हिंदीच्या घरातून बाहेर पडत आहेत. मात्र त्यांच्या केसेसच्या सुनावणीनंतर ते पुन्हा बिग बॉसच्या घरात जाणार का, अशी चर्चा सध्या सुरू आहे. संबंधित प्रकरणाची सुनावणी आता १९ नोव्हेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. त्यानंतर गुणरत्न सदावर्ते पुन्हा बिग बॉसच्या घारात जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

## लाडक्या बहिणीच्या मृत्यूवरून संभाजीराजे संतापले



**नांदेड :** येथे रविवारी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला ५३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. शांताबाई शिवाजी मोर असे या मयत महिलेचे नाव आहे. या घटनेवर छत्रपती संभाजीराजे यांनी राज्य सरकारवर संताप व्यक्त केला आहे.

छत्रपती संभाजीराजे म्हणाले, नांदेड येथे रविवारी लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी १० वाजल्यापासून महिलांना सक्तीने बोलावण्यात आले होते. यात एका महिलेचा मृत्यू झाला. मात्र प्रशासनाने हा मृत्यू हार्ट अटॅकने झाला असल्याचे सांगितले. तुम्ही पैसे द्या, त्यांच्या अकाऊंटवर टाका तुमचे कौतुक आहे. पण

राजकीय स्टंट करू नका, अशी टीक छत्रपती संभाजीराजे यांनी महायुती सरकारवर केली आहे.

छत्रपती संभाजीराजे यांनी विधानसभा निवडणुकीवर छत्रपती संभाजीराजे म्हणाले, विधानसभेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त जागा लढवण्याचा आमचा माणस आहे आणि अनेक लोक आमच्या संपर्कात असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, आम्ही विस्थापित लोकांना संधी देणार आहोत. पण चांगले लोक प्रस्थापितांमधून आले तर त्यांचे पण आम्ही स्वागत करू.

महाविकास आघाडी तसेच महायुती सरकारवर टीका करताना संभाजीराजे म्हणाले, महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये गोंधळ सुरू आहे. त्यांनाच माहीत नाही की त्यांचे नाराज लोक कुठे जाणार आजेत. थोड्या दिवसांत वेगळे चित्र दिसेल. मनोज जरांगे पाटील यांना मी विनंती केली आहे की पाडण्यापेक्षा सकारात्मक दृष्टिकोण ठेवला पाहिजे. आपली लोक तुमच्या माध्यमातून असेल किंवा स्वराज्याच्या माध्यमातून असतील हे लोक विधानसभेच्या पटलावर आपला आवाज मांडू शकतील, असे छत्रपती संभाजीराजे म्हणाले आहेत.

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना संभाजीराजे म्हणाले, मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षण टिकेल की नाही याबाबत समाज शाश्वत नाही. समाजाचा आग्रह होता मराठा कुणबी एकच आहे. प्रामुख्याने मराठवाड्यातील मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळाले नाही. मी सुद्धा ही लढाई २००७ पासून लढत आहे. त्यामुळे १० टक्के आरक्षण टिकेल की नाही माहीत नाही, असे संभाजीराजे म्हणाले आहेत.

पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले, येवला येथे मराठा आंदोलक आणि भुजबळ समर्थकांमध्ये वाद झाल्याचे समजले. आपण समाज म्हणून एकत्रित राहतो. मराठा असो की ओबीसी असो किंवा अन्य कोणता समाज, आपल्याला एकत्रित राहायचे आहे. मोठ्या नेत्यांनी सुद्धा दोन समाजात तेढ निर्माण होईल, असे विधान करू नये, असा सल्ला संभाजीराजे यांनी दिला आहे.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002